# मंत्रिमंडळ निर्णय

## १५ जानेवारी २०१४

## (मंत्रिमंडळ बैठक क्र.१४५)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | जवाहर, तसेच धडक विहिरींची कामे आता  मनरेगामार्फत पूर्ण करणार | रोजगार हमी योजना |
| २ | गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी “व्हिक्टीम कॉम्पेन्सेशन” योजना लागू | गृह |
| ३ | गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सुरक्षा आयोग गठीत करण्याचा निर्णय; पोलीसांसाठी ४ आस्थापना मंडळ स्थापन करणार | गृह |
| ४ | राज्यातील रोजगार व बेरोजगारांची पाहणी करणार | नियोजन |
| ५ | करमणूक शुल्क जमा करण्याची जबाबदारी केबल ऑपरेटरबरोबरच मल्टीसिस्टीम ऑपरेटर्स यांची देखील | महसूल |
| ६ | जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून बिगर सिंचन पाणी आरक्षणाच्या ४० प्रस्तावांना मान्यता | जलसंपदा |
| ७ | अनुदानीत आश्रमशाळातील वाढीव तुकड्या आणि पदांना मान्यता | आदिवासी विकास |
| ८ | मानखुर्द येथील द चिल्ड्रेन्स एड् सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देण्याचा निर्णय | महिला व बालविकास |

## जवाहर, तसेच धडक विहिरींची कामे
## आता मनरेगामार्फत पूर्ण करणार

जवाहर, तसेच धडक सिंचन विहीर कार्यक्रमातील अनुसुचित जाती, जमातीच्या, तसेच लहान शेतकऱ्यांच्या प्रगतीपथावरील ११ हजार ५२९ विहिरी, तसेच सर्वसाधारण लाभार्थ्यांच्या १२ हजार ९९१ अशा २४ हजार ५२० विहिरी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमार्फत पूर्ण करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्य रोजगार हमी योजने अंतर्गत" जवाहर विहीर"ही लोकप्रिय अशी जुनी योजना असून सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लक्ष ४० हजार इतक्या विहीरी पूर्ण करण्यात आल्या आहेत. ही योजना अनुदानित स्वरुपाची प्रतिपूर्ती योजना असून सद्य:स्थितीत या योजने अंतर्गत लाभार्थांना विहीरीची कामे पूर्ण करण्यासाठी एक लाख रुपये अनुदान देण्यात येते. अनुसूचित जाती ,अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गाच्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळतो.

ही योजना, पंतप्रधान पॅकेजचा एक भाग म्हणून" धडक सिंचन विहीर "या नावाने विदर्भातील ६ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत असून या अंतर्गत प्रमाणावर विहीरींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. सद्यस्थितीत या योजनेंतर्गत देण्यात येणारे एक लाख मोठ्या रुपयांचे अनुदान विहीरीची कामे पूर्ण करण्यास अपुरे आहे. त्यामुळे राज्यात २४ हजार .विहीरी अपूर्ण आहेत ५२०

त्याच वेळेस महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ६ महाराष्ट्र अंतर्गत विहीरींसाठी प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाची रक्कम तीन लाख रुपयांच्या मर्यादेत अदा करण्यात येतेही योजना त्यामुळे सध्या . .राज्यात जास्त लोकप्रिय आहे

सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी असलेल्या या योजनेत सद्यस्थितीत प्रती विहिर देण्यात येत असलेल्या एक लाख रुपये अनुदानात, एक लाख ५० हजार रुपये इतकी अतिरिक्त वाढ करण्यात येत असून एकूण अनुदान दोन लाख ५० हजार इतके करण्यात येत आहे. हे अनुदान विहीरी ३० जून २०१४ पर्यंत पूर्ण करण्याच्या अटीवर देण्यात येईल. या प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या विहीरी पूर्ण करण्यासाठी शासन २५८ कोटी रुपये इतके अतिरिक्त अनुदान खर्च करेल .

------o------



## गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्यांच्या
## कुटुंबियांना मदत देण्यासाठी "व्हिक्टीम कॉम्पेन्सेशन" योजना लागू

राज्यात एखाद्या गुन्ह्यामध्ये बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासाठी व्हिक्टीम कॉम्पेन्सेशन योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात एखाद्या गुन्ह्यांमध्ये जिवीतहानी झाल्यास या योजनेंतर्गत जिल्हा / राज्य विधी सेवा प्राधिकरणामार्फत त्या व्यक्तीच्या वारसांना कमाल दोन लाख रुपये, कायमचे अपंगत्व आल्यास त्या व्यक्तीस कमाल ५० हजार रुपये आणि ॲसिड हल्ला झाल्यास त्या व्यक्तीस ३ लाख रुपये एवढी नुकसान भरपाई देण्यात येईल. याशिवाय बळी पडलेल्या व्यक्तीच्या अत्यसंस्कारासाठी २ हजार रुपये आणि तातडीच्या वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी १५ हजार रुपयांपर्यत मदत देण्यात येणार आहे. या योजनेचे संनियंत्रण गृह विभाग करेल. -----o-----

## गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सुरक्षा आयोग गठीत करण्याचा निर्णय; पोलीसांसाठी ४ आस्थापना मंडळ स्थापन करणार

राज्याचे गृह मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सुरक्षा आयोग गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामध्ये विधान सभा विरोधी पक्ष नेत्यासह मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव (गृह), पाच अशासकीय सदस्य व पोलीस महासंचालक यांचा समावेश राहणार आहे. हा आयोग सुरक्षेसंदर्भात धोरणात्मक बाबीसंबंधात राज्य शासनास शिफारशी करेल अशा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाने प्रकाश सिंग प्रकरणी रिट याचिका क्र.३१०/१९९६ मध्ये दि.२२/०९/२००६ रोजी खालील मुद्दयांवर कार्यवाही करण्याचे निदेश दिले आहेत.राज्य सुरक्षा आयोग

१. पोलीस महासंचालकांची निवड व त्यांचा कार्यकाळ

२. पोलीस महानिरीक्षक, पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस अधिक्षक व पोलीस निरीक्षक या पदांचा सर्वसाधारण कालावधी निश्चित करणे

३. अन्वेषण पोलीस आणि कायदा व सुव्यवस्था हाताळणारी यंत्रणा वेगळी करणे

४. पोलीस आस्थापना मंडळ

५. पोलीस तक्रार प्राधिकरण

मंत्रिमंडळ उप समितीने एकमताने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने गृह विभागाने तयार केलेल्या प्रस्तावावर मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन पोलीस दलाशी संबंधित महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने घेण्यात आले. ते पुढील प्रमाणे...

पोलीस महासंचालकांची निवड व कार्यकाळ ๕ चार ज्येष्ठ महासंचालकांमधून एकाची निवड पोलीस महासंचालक पदावर करण्यात येईल. पोलीस महासंचालकांचा कार्यकाळ सेवानिवृत्तीपर्यंत किंवा किमान दोन वर्षे राहील.

१. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या पदाचा सर्वसाधारण कालावधी निश्चित करणे - सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व मॉडेल पोलीस अधिनियमाप्रमाणे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या पदांचा सर्वसाधारण कालावधी दोन वर्षाचा राहील. महत्त्वपूर्ण कारणासाठी बदलीसंदर्भात निदेश देण्याचा अधिकार राज्य शासनास असेल.

२. गुन्हे अन्वेषण यंत्रणा आणि कायदा व सुव्यवस्था हाताळणारी यंत्रणा वेगळी करणे - पोलीस यंत्रणेतील गुन्हा अन्वेषण आणि कायदा व सुव्यवस्था पोलीस हाताळणारी पोलीस यंत्रणा शक्यतो व जास्तीत जास्त वेगळी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३. पोलीस आस्थापना मंडळ - पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबीसंबंधात चार आस्थापना मंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामधील

(अ) आस्थापना मंडळ क्र.१ हे अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आले असून त्यामध्ये पोलीस महासंचालक, महासंचालक (लाचलूचपत प्रतिबंधक विभाग), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचा समावेश आहे.

हे आस्थापना मंडळ पोलीस उप अधिक्षक व त्यावरील राज्य पोलीस सेवेतील अधिकारी व भा.पो.से. अधिकारी यांच्या पदस्थापना व बदल्यांबाबत शासनास शिफारस करील.

(ब) आस्थापना मंडळ क्र.२ हे पोलीस महासंचालकाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आले असून त्यामध्ये महासंचालक (लाचलूचपत प्रतिबंधक विभाग), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई आणि अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग व अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचा समावेश आहे. पोलीस निरीक्षक व त्याखालील पदांच्या सर्वसाधारण बदल्या व पदस्थापनेचे सर्वाधिकार पोलीस महासंचालकांना देण्यात आले आहेत.

(क) परिक्षेत्र स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ हे संबंधित परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यातआले असून त्यामध्ये त्या परिक्षेत्रातील दोन वरिष्ठतम पोलीस अधिक्षक तसेच वाचक (पोलीस उप अधिक्षक) यांचा समावेश आहे. त्यांना परिक्षेत्रातील पोलीस निरीक्षक व त्याखालील अधिका-यांच्या त्या परिक्षेत्रात बदली करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

(ड) पोलीस आयुक्तालय स्तरावरील आस्थापना मंडळ हे संबंधित संबंधित पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आले असून त्यामध्ये संबंधित आयुक्तालयातील सह पोलीस आयुक्त/अपर पोलीस आयुक्त/उप आयुक्त स्तरावरील दोन वरिष्ठतम अधिकरी तसेच पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांचा समावेश आहे. त्यांना संबंधित पोलीस आयुक्तालयातील पोलीस निरीक्षक व त्याखालील अधिका-यांच्या त्या आयुक्तालय क्षेत्रात बदली करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

सन २००५ च्या बदली अधिनियमाच्या तरतूदीनुसार, मा. मुख्यमंत्री यांना अपर पोलीस अधिक्षक व भा.पो.से. संवर्गातील एकूण ३९७ पदांच्या बदल्या करण्याचे अधिकार होते. आता या निर्णयानुसार भा.पो.से. संवर्गातील २२३ पदांच्या बदल्यांचे अधिकार मा. मुख्यमंत्री महोदयांकडे राहतील.

बदली अधिनियमानुसार, मंत्री (गृह) यांना पोलीस उप अधिक्षक, पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक या संवर्गातील एकूण ८६०८ पदांच्या बदल्या करण्याचे अधिकार होते. आता या निर्णयानुसार पोलीस उप अधिक्षक व अपर पोलीस अधिक्षक संवर्गातील ९९१ पदांच्या बदल्यांचे अधिकार मंत्री (गृह) यांच्याकडे राहतील.बदली अधिनियमानुसार, पोलीस महासंचालक व त्यांच्या अखत्यारीतील घटक प्रमुख यांना पोलीस उप निरीक्षक व त्याखालील एकूण १,९८,८८८ पदांच्या बदल्या करण्याचे अधिकार होते. आता या निर्णयानुसार पोलीस निरीक्षक व त्याखालील २,०६,६७९ पदांच्या बदल्यांचे अधिकार पोलीस महासंचालकांना देण्यात आले आहेत.

पोलीस तक्रार प्राधिकरण -- राज्यस्तरावर एक तसेच विभागीय स्तरांवर सहा पोलीस तक्रार प्राधिकरणे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस अधिकाऱ्यांविरुध्द पोलीस कोठडीतील मृत्यू, भा.दं.वि. कलम ३२० मध्ये नमूद केलेली गंभीर दुखापत, बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न, विहीत प्रक्रीयेचे पालन न करता केलेली अटक किंवा स्थानबध्दता, भ्रष्टाचार, खंडणी, जमीन/घर बळकावणे वा अधिकारांचा दुरुपयोग यासंबंधातील गंभीर आरोपांच्या तक्रारींच्या चौकशीचे अधिकार या प्राधिकरणांना असतील. पोलीस उप अधिक्षक व त्यावरील अधिका-यांविरुध्दच्या तक्रारी राज्यस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरणांकडून हाताळल्या जातील तर पोलीस निरिक्षक व त्याखालील अधिकारी/कर्मचा-यांविरुध्दच्या तक्रारी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणांकडून हाताळल्या जातील.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार गृह विभागाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावाचा अभ्यास करुन राज्य शासनास शिफारशी करण्यासाठी मा. मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली एकूण ८ मंत्री व अपर मुख्य सचिव (गृह) यांची मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती. त्याप्रमाणे सविस्तर चर्चा होऊन वरील निर्णय एक मताने घेण्यात आले. -----०-----

नियोजन विभाग

## राज्यातील रोजगार व बेरोजगारांची पाहणी करणार

राज्यातील रोजगार आणि बेरोजगारांची चौथी पाहणी करण्याच्या कामास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयामार्फत ही पाहणी वर्ष २००९-१० पासून श्रृंखला पध्दतीने घेण्यात येते. पहिली रोजगार व बेरोजगार पाहणी वर्ष २००९-१० मध्ये, दुसरी वर्ष २०१०-११ आणि तिसरी वर्ष २०११-१२ मध्ये घेण्यात आली. चौथ्या पाहणीच्या केंद्र नमुन्याचे काम डिसेंबर २०१३ मध्ये सुरु झाले आहे. या पाहणीमध्ये राज्य स्वतंत्र नमुना निवड करून सहभागी होणार आहे. हे काम अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येईल. यामुळे राज्यातील रोजगार स्थितीचा अंदाज येईल. तसेच जिल्हा स्तरावरील रोजगार स्थिती अंदाजित करण्यासाठी याचा उपयोग होईल.

-----०-----

महसूल

## करमणूक शुल्क जमा करण्याची जबाबदारी केबल ऑपरेटरबरोबरच मल्टीसिस्टीम ऑपरेटर्स यांची देखील

मल्टी सिस्टीम ऑपरेटर आणि केबल ऑपरेटर यांची सुधारित व्याख्या आणि जबाबदारी निश्चित करण्याचा, त्याचप्रमाणे करमणूक शुल्क जमा करण्याची जबाबदारी या दोघांवरही सोपविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या अनुषंगाने मुंबई करमणूक शुल्क अधिनियम १९२३ मधील कलमांमध्ये सुधारणा करून अध्यादेश काढण्यात येईल. या निर्णयामुळे शासनाला प्राप्त होणाऱ्या करमणूक शुल्कामध्ये भरीव वाढ होणार आहे. तसेच, मल्टी सिस्टीम ऑपरेटर्स व केबल ऑपरेटर्स यांच्यावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणे शासनाला शक्य होणार आहे.

केंद्र शासनाने केबल टेलिव्हीजन नेटवर्क अमेंडमेंट ॲक्ट, २०११ अन्वये सुधारणा करून प्रथम मोठ्या शहरांमध्ये आणि नंतर म्हणजेच ३१ डिसेंबर,२०१४ पर्यंत संपर्ण देशात केबल टेलिव्हीजन सेटटॉप बॉक्सद्वारे डिजिटल पध्दतीनेच प्रक्षिपेत करणे अनिवार्य केले जाणार आहे. राज्यात याची अंमलबजावणी प्रथम मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि पिंपरी-चिंचवड आदी शहरांमध्ये करण्यात आलेली आहे. यामुळे स्वच्छ व चांगल्या स्वरूपाचे चित्र पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.

डिजिटल पध्दतीने प्रक्षेपित करण्यासाठी मल्टी सिस्टीम ऑपरेटर (MSO) यांनी कनेक्शन ॲक्टीव्हेट केल्याशिवाय चॅनलचे प्रक्षेपण दिसणार नाही. मल्टी सिस्टीम ऑपरेटर्सची भूमिका यामध्ये अतिशय महत्त्वपूर्ण राहणार असून, सर्व स्थानिक केबल्स ऑपरेटरवर त्यांचे नियंत्रण राहणार आहे. याकरिता महाराष्ट्र करमणूक शूल्क अधिनियम,१९२३ मध्ये सुधारणा करून त्यामध्ये मल्टी सिस्टीम ऑपरेटर व केबल ऑपरेटर्स यांची सुधारित व्याख्या आणि त्यांची जबादारी निश्चित करण्यात आली आहे.

राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रात प्रतिदूरचित्रवाणी संचावर प्रतिमाह ४५रुपये , सर्व -अ॰, -ब॰ नगरपरिषद हद्दीमध्ये ३० रुपये आणि ग्रामीण क्षेत्रामध्ये १५ रुपये याप्रमाणे करमणूक शुल्क आकारण्यात येईल. या करमणूक शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. फक्त करमणूक शुल्क जमा करण्याची जबाबदारी मल्टी सिस्टीम ऑपरेटर्स व केबल ऑपरेटर्स यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

-----०-----

## जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून
## बिगर सिंचन पाणी आरक्षणाच्या ४० प्रस्तावांना मान्यता

जलसंपदा विभागाच्या बिगर सिंचन पाणी आरक्षणाबाबतच्या ७ घरगुती (पिण्याचे पाणी) व ३३ औद्योगिक पाणी आरक्षण प्रस्तावांना आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मौजे चांगेफळ ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता.सिंदखेडराजा जि.बुलढाणा, पार्डी टाकमोर ग्रामीण पाणी पुरवठा योजना ता. वाशिम, जि.वाशिम, उदगीर शहर पाणी पुरवठा योजना ता.उदगीर, जि.लातुर, धुळदेव व अलगुडेवाडी प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना ता. फलटण जि. सातारा, कोटेश्वरवाडी पाणी पुरवठा योजना कोटेश्वरवाडी (देहू रोड कॅन्टोंनमेंट) ता. मावळ, जि. पुणे,टाकळघाट पाणी पुरवठा योजना ता.हिंगणा, जि.नागपूर व ग्रुप ग्रामपंचायत खरड, नेवाळी व खोणी-वडवळी बु. ता. अंबरनाथ, जि. ठाणे) हे ७ घरगुती योजनांचा प्रस्ताव आहेत.

<u>३३ औद्योगिक प्रस्तावांना मान्यता</u>

तसेच मौजे. गोपूज, उबंरडे,पुसेगांव, खटाव या ठिकाणी नियोजित औद्योगिक वसाहतीसाठी पाणी आरक्षण ता.खटाव जि. सातारा, दिल्ली- मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर, धुळे, में पृथ्वी फेरो अलॉईज प्रा.लि. सिर्सि ता. मुल जि. चंद्रपूर, मांडके अँड मांडके इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. पुणे यांचे प्रस्तावित पर्यटन व टाऊनशिप ता. गुहागर जिल्हा रत्नागिरी, मे.गारनेट कंस्ट्रक्शन लि. आंबिवली, ता. खालापूर, जि. रायगड, मे. एशियन कलर कोटेड इस्पात लि. दहीवली, ता. खालापूर, जि. रायगड, मे. गोदरेज अँड बॉईसी मॅन्युफॅक्चरींग कं. तांबाटी ता. खालापूर, जि.रायगड, मे. आदित्य बिर्ला न्यूवो लि. केमीकल डिव्हीजन पाताळगंगा, लोहोप तळवली, ता. खालापूर, जि. रायगड, मे. हेडलबर्ग सिमेंट इंडिया लि.(इंडोरामा) कारावी ता. पेण जि. रायगड, सायनर्जी डायग्नॉस्टिक प्रा.लि. ठाणे, टाटा पॉवर कंपनी लि. यांचा नियोजित भिवपूरी विद्युत प्रकल्प ता. कर्जत, जि.रायगड, टॉपवर्थ पाईप्स व टयूबस् प्रा. लि. कं.मैाजे. हेदवली, ता.सुधागड, जि. रायगड, मे. पॅनामॅट्रीक इंजीनिअरींग प्रा. लि. मौ.रासळ, ता. सुधागड, जि. रायगड, में. लिबर्टी फॅास्फेट लि. मौ.रासळ, ता. सुधागड, जि. रायगड, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र दोंडाईचा टप्पा क्र. १ व २ ता. शिंदखेडा, जि.धुळे, टेसिटूरा मॉंटी इंडिया प्रा.लि. तामगांव ता. करवीर जि. कोल्हापूर यांचा वाढीव पाणी आरक्षण प्रस्ताव, रिव्हर रेसीडेसी गृह प्रकल्प मौजे चिखली ता. हवेली जि. पुणे, बिल्ट ग्राफिक पेपर प्रॉडक्ट लि. भादलवाडी (भिगवण) ता. इंदापूर जि. पुणे यांचा वाढीव पाणी आरक्षण प्रस्ताव, मेगी ॲग्रो केम लि. सडगांव, ता. जि. धुळे, खेड इकॉनॉमीक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मु.पो.खेड, ता.खेड, जि.पूणे, श्रीनिवास इंजिनिअरिंग ॲटो कॉम्पोनंट प्रा. लि. मु.पो.नवलाखउंब्रे, ता.मावळ, जि.पूणे, लोकप्रिय दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या. तळणी, ता. मोताळा, जि.बुलढाणा, सरस्वती दूध उत्पादक सहकारी संस्था मर्या. डिडोळा, ता. मोताळा, जि.बुलढाणा, बारामती ॲग्रो प्रा.लि. पिंपळी मौजे काटेवाडी व कन्हेरी ता.बारामती,जि.पुणे, बारामती ॲग्रो लि. मौ.गुळुंचे ता.पुरंदर,जि.पुणे, सिमेक्स प्रोव्हेक जेनेस्टिकइंडिया प्रा.लि. मौजे थोपटेवाडी ता. पुरंदर जि.पुणे. गोविंद मिल्क अँड मिल्क प्रोडक्टस् प्रा.लि. कोळकी, ता.फलटण,जि.सातारा, वैश्विक फुडस प्रा लि.विंग ता.खंडाळा जि.सातारा.,गोदरेज ऍन्ड बायस् मॅन्युफॅक्चरिंग लि. शिरवळ, ता. खंडाळा जि. सातारा, गोदरेज ऍन्ड बायस् मॅन्युफॅक्चरिंग लि. लॉकीम मोटार ग्रुप शिंदेवाडी ता. खंडाळा जि. सातारा, विठ्ठल डिस्ट्रीलरीज लि.आवार पिंपरी ता.परंडा, जि.उस्मानाबाद. प्रभात डेअरी प्रा.लि.रांजणखोल ता.राहता, जि.अहमदनगर व सुंदरराव सोळुंके, टेक्सटाईल पार्क (माजलगाव) चाटगाव ता.धारुर,जि.बीड या ३३ औद्योगिक प्रस्तावांचा समावेश आहे.

-----०-----

<u>आदिवासी विकास</u>

## अनुदानीत आश्रमशाळातील वाढीव तुकड्या आणि पदांना मान्यता

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानीत आश्रमशाळांच्या कायमस्वरुपी २०० अतिरिक्त तुकड्यांपैकी ४८ अनुदानीत आश्रमशाळांमधील १३७ तुकड्यांना तसेच त्या अनुषंगाने पद निर्मितीस आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

अतिरिक्त तुकड्यांमध्ये झालेल्या वर्षनिहाय वाढीमुळे २०१०-१३ या तीन वर्षात एकूण १३७ शिक्षकांची पदे निर्माण होत असून सुमारे ६१०.७४ लाख यावरील खर्च तसेच नियमित वेतनश्रेणीवर आल्यानंतर वार्षिक ९०७.०१ लाख खर्च येणार आहे. या खर्चासही मान्यता देण्यात आली.

-----o-----

<u>महिला व बालकल्याण</u>

## मानखुर्द येथील द चिल्ड्रेन्स एड् सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देण्याचा निर्णय

मानखुर्द येथील चिल्ड्रेन्स एड् सोसायटीमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालकल्याण नगरी या संस्थेतील कर्मचाऱ्यांना (गृहमाता) यांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

ही वेतनश्रेणी १ फेब्रुवारी १९९३ पासून लागू करून कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल आणि त्यानंतर या कर्मचाऱ्यांना वेतनाची थकबाकीही देण्यात येईल. या संस्थेतील ४६ कर्मचाऱ्यांपैकी गट क मधील २२ तर गट ड मधील २४ कर्मचारी आहेत. ४६ कर्मचाऱ्यांपैकी सध्या ११ कर्मचारी कार्यरत असून ३३ कर्मचारी सेवानिवृत्ती झाले आहेत. या कर्मचाऱ्यांसाठी २ कोटी ९८ लाख ७७ हजार एवढे अनुदान मंजूर करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

------o-----